# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** जालना **P.S.(ठाणे):** तालुका जालना
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0793 **Year (वर्ष):** 2024
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 19/12/2024 21:33

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** गुरूवार **Date From (दिनांक पासून):** 19/12/2024
**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 19/12/2024
**Time From (वेळेपासून):** 14:44 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 14:44 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 19/12/2024 **Time (वेळ):** 21:24 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 036
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 19/12/2024 21:24 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** सोरटी नगर मधील धनराज भिमराव सा

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**



CamScanner

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** ज्ञानेश्वर इंद्रकुमार काळे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1991

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | रंगनाथनगर,तालुका जालना,जालना,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | रंगनाथनगर,तालुका जालना,जालना,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9561886689

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | शिवदास प्रेमसिंग पवार | | | 1. सोरटीनगर, ग्राम महसुल अधिकारी सजा इंदेव,जालना, तालुका जालना,जालना,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 20,000/ रुपये लाचेची रक्कम | 20,000.00 |



CamScanner

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रु. |
|---|---|---|---|---|
| | | | न्थ्रासिन पावडर लागलेली | |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

20,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक 19.12.2024.

मी ज्ञानेश्वर इंद्रकुमार काळे वय 33 वर्ष व्यवसाय शेती रा.रंगनाथ नगर, इंदेवाडी ता.जि.जालना मो.नं. 9561886689 ईमेल आयडी-aadarshurbank77@gmail.com.

समक्ष ॲन्टी करप्शन ब्युरो जालना येथे हजर येवून फिर्याद देतो की, मी दिनांक 18.12.2024 रोजी ॲन्टी करप्शन ब्युरो जालना येथे हजर राहुन तक्रार दिली होती की, मी वरील ठिकाणी आई वडिलांसह राहत असुन शेती करुन कुटुंबाचा उदरनिर्वाह करतो.

मी राहत असलेल्या घराच्या बाजुला असलेला गट क्रमांक 34 मधील प्लॉट क्रमांक 68 ज्याचे क्षेत्र फळ 150 चौरस मिटरचा विक्री असल्याने मी सदरचा प्लॉट बाजार भावाप्रमाणे 3,00,000/-रुपयात विकत घेऊन दिनांक 16.03.2024 रोजी इसम नामे जानकीराम रंगनाथ तायडे वय 48 वर्ष रा.चंदनझिरा जालना यांना 1,50,000/- रुपये ईसार पोटी रक्कम देवुन बॉण्ड पेपरवर रितसर ईसार पावती करुन घेतली होती.

त्यानंतर मी वरील प्लॉट खरेदीखत करुन घेण्यासाठी सह दुय्यम निबंधक कार्यालय जालना येथे गेलो असता वरील प्लॉटची 7/12 वर ईसारपावती लिहुन देणार जानकीराम रंगनाथ तायडे व त्यांचा भाऊ सुंदर रंगनाथ तायडे यांच्या नावावर समाईक क्षेत्र अशी नोंद आढळुन आल्याने आमचे खरेदीखत झाले नाही. त्यावेळी मी ईसारपावती लिहुन देणार जानकीराम रंगनाथ तायडे यांची मुळ खरेदीखत पाहिले असता त्यामध्ये दोन्ही भावांचे क्षेत्र हे वेगवेगळे असुन त्यावेळीचे संबंधीत गावाचे तलाठी यांच्या कडुन फेर घेतांना फेरफार क्रमांक 3791 नुसार समाईक क्षेत्र अशी नोंद झालेली असल्याचे समजले.

त्यानंतर दिनांक 11.12.2024 रोजी ईसारपावती लिहुन देणार जानकीराम रंगनाथ तायडे व त्यांचा भाऊ सुंदर रंगनाथ तायडे हे माझ्या कडे आले व मला म्हणाले की, आम्ही तहसील कार्यालय जालना येथे जावुन फेरफार क्रमांक 3791 हा दुरुस्ती करण्यासाठी प्रयत्न केले असता आम्ही ज़ास्त शिकलेलो नसल्याने आम्हास ते जमले नाही. त्यामुळे आम्ही तुम्हास गट क्रमांक 34 मधील प्लॉट क्रमांक 68 चे खरेदीखत करुन देवु शकलो नाही. परंतु तुम्ही आमच्या समाईक क्षेत्राचा फेरफार क्रमांक 3791 हा दुरुस्ती करुन घ्या, त्यानंतर आपण आपले खरेदीखत करु असे सांगितले असता मी त्यावेळी त्यांना होकार दिला. त्यावेळी त्या दोघां भावांनी त्यांच्या सहीचा समाईक क्षेत्राचा फेरफार क्रमांक 3791 हा दुरुस्ती करण्याबाबतचा अर्ज माझ्या कडे दिला.

त्यावरुन मी दिनांक 16.12.2024 रोजी तहसील कार्यालय जालना येथे जावुन तलाठी सज्जा इंदेवाडी चे तलाठी पवार यांना भेटुन फेरफार क्रमांक 3791 हा दुरुस्ती करण्याबाबत विनंती केली. त्यावेळी तलाठी पवार किचकट काम हे लय, त्याला खर्च येईल असे मला म्हणाले असता मी त्यांना नाईलाजाने होकार दिला. त्यावेळी त्यांनी मला दिनांक 18.12.2024 रोजी त्यांच्या नेहमी बसण्याच्या ठिकाणी अंबड चौफुली येथील खाजगी कार्यालयात येण्यास सांगितले.

मला तलाठी पवार यांना लाच देण्याची इच्छा नाही. त्यांची व माझी वैयक्तिक दुश्मनी नाही किंवा त्यांचा माझा देण्या घेण्याचा कोणताही आर्थिक व्यवहार नाही. मी जर त्यांना लाच दिली नाही तर ते फेरफार क्रमांक 3791 चे दुरुस्ती करण्याबाबतचे काम करणार नाही. त्यामुळे मी आज रोजी ॲन्टी करप्शन ब्युरो जालना येथे तक्रार देण्यासाठी आलो आहे.

मी आज दिनांक 18.12.2024 रोजी तलाठी सज्जा इंदेवाडी चे तलाठी पवार यांना त्यांच्या नेहमी बसण्याच्या



CamScanner

ठिकाणी अंबड चौफुली येथील खाजगी कार्यालयात जावुन भेटणार असुन वरील कामाबाबत बोलणी करणार आहे. त्यावेळी त्यांनी माझ्या कडे लाचेची मागणी करुन स्वत: किंवा इतरां मार्फत स्विकारल्यास कायदेशीर कारवाई करावी ही विनंती अशा मजकुराची तक्रार दिली होती. माझ्या दिलेल्या तक्रारी वरुन अॅन्टी करप्शन ब्युरो जालना येथील पोलीस उप अधीक्षक श्री.बाळु जाधवर यांनी दोन शासकिय पंचाना बोलावुन माझी व पंचाची ओळख करुन देवुन माझी तक्रार त्यांना दाखविली. त्यावर मी, पंचानी व पोलीस उप अधीक्षक श्री.जाधवर यांनी सह्या केल्या.

मी तलाठी पवार यांचे विरुध्द दिलेली तक्रार खरी आहे काय ? ते माझ्या कडे लाच मागतात काय ? याची खात्री करण्यासाठी मला, दोन्ही पंचाना व सापळा पथकास पोलीस उप अधीक्षक श्री.बाळु जाधवर यांनी सुचना देवुन पोलीस अंमलदार श्री.घायवट यांनी व्हाईस रेकॉर्डर मशीन मध्ये एक नविन मेमरी कार्ड टाकुन त्यामध्ये पूर्वीचे कोणतेही संभाषण नसल्याची खात्री करुन दिली. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर मशीन सुरु करुन त्यामध्ये पोलीस उप अधीक्षक श्री.बाळु जाधवर, दोन्ही पंचाचे व माझे वक्तव्य घेऊन व्हाईस रेकॉर्डर मशीन एका कापडी पिशवीत टाकुन माझ्या शर्टाच्या आतुन गळ्यात अडकवण्यात आली. त्यानंतर मला पंच क्र.1 भालमोडे यांचे सोबत तलाठी पवार यांना भेटण्यासाठी पाठविण्यात आले. मी व पंच क्र.1 भालमोडे असे आम्ही माझ्या कडील मोपेड स्कुटीने तलाठी पवार त्यांच्या नेहमी बसण्याच्या ठिकाणी अंबड चौफुली येथील खाजगी कार्यालय येथे जावुन तलाठी पवार यांची भेट घेतली. त्यावेळी मी तलाठी पवार यांना नमस्कार, कही नही ते त्या दिवशी भेटलो होतो, ऑफीसला असे म्हणालो असता त्यावर हा, हा असे म्हणाले. त्यावर मी ते आपण प्लॉट घेतलेला आहे पहा त्याच्या कडून पण ते सामाईक क्षेत्र असल्यामुळे रजिष्ट्री होवू नही लागली, ते सामाईकच वेगळ वेगळ करायच होत, त्याची रजिष्ट्री झालेली हय, पहा मी तहसिलदार मॅडमला भेटलो होतो, त ते म्हणे तुम्ही तलाठी साहेबानांच भेटून घ्या, तुम्ही म्हणले होते न असे म्हणालो असता त्यावर तलाठी पवार हे नाव सातबाराला आहे का,आज घडीला देणाऱ्याचे नाव माणिकराव असे म्हणाले. त्यानंतर माझे व तलाठी पवार यांचे आपसात कामा संबंधी बरीच चर्चा झाली. त्यानंतर तलाठी पवार बर दोन दिवस थांबा, पण तुम्ही एक काम कराना, अर्ज देवूनच टाकाना एक पोहोचे मला द्या, मग आपण करुन, आपण हॅन्ड टु हॅन्ड करु ते ही मार्ग हा, फक्त, तुम्ही त्याला अर्ज द्या, एक पोहोच मला द्या असे म्हणाले असता त्यावर मी ओसी मी लागलत आज आणून देतो तुम्हाला असे म्हणालो. त्यावर तलाठी पवार आज नाही उद्या द्या, मी चाललो बाहेर जरा, हे हॅन्ड टु हॅन्ड करु हे आपल्या हातातल हय समजा, पण तहसिलदार च्या नावान पत्र द्यावच लागतय, कारण की संदर्भात टाकाव लागतय, संदर्भात टाकून माझा अहवाल, तुमची खरेदी खताची झेरॉक्स सातबारा, फेरफार नक्कल, माझा अहवाल जोडून मग तिथ मॅडमकडूनच पत्र काढाव लागतय 155 चा आदेश असे म्हणाले असता त्यावर मी बर मी आता हे पत्र आजच्या डेटला देवून टाकतो लगेच ओसी आपल्या जवळ देतो, त्याला किती खर्च येईल सर अंदाजे काही असे म्हणाले. त्यावर तलाठी पवार आता त्याच्यात तहसिलदार मॅडम पण पैसे घेते बरका, नुसत बोलायला वेगळ हय, पण 155 चा आदेश द्यायला मॅडम पण पैसे घेते असे म्हणाले असता त्यावर मी मला सांगान, म्हणजे मी तुमच्या जवळ देवून टाकतो, आता माझ्याकडून त कही डायरेक्टली घेणार नाही मॅडम असे म्हणालो. त्यावर तलाठी पवार पेशकार आहे शिंदे म्हणून, शिंदे तयार करतात त्याच्यावर मॅडमच्या सहया घेतात सहया घेतल्यानंतर पुन्हा आमच्याकडे फेर टाकायला देतात ते, 155 चा दूरस्ती फेर घेण आम्हाला कराव लागतय असे म्हणाले असता त्यावर मी ते लवकर झाल पाहिजे असे म्हणालो. त्यानंतर थोडया वेळाने मी अंदाजे किती खर्च येईल असे म्हणालो असता तलाठी पवार यांनी पंच क्र.1 भालमोडे यांचे समक्ष एक वीस एक हजार रुपये खर्च येईल असे म्हणाले. त्यावर मी ओह, खूप झाल ना सर असे म्हणालो असता त्यावर तलाठी पवार ऐकुन घ्या ना, म्हणजे कस हय मी माझ फ्रि मध्ये करीन पण कस ते आत शिंदे हय ते नुसता मग कागदी घोडा नाचवतो असच झाल तसच झाल हिअरींग घ्या, अन मिटींग घ्या, असच चालतय महिना दोन महिना असे म्हणाले. त्यावर मी बर मग मी उद्या पेमेंट देवून टाकतो तुम्हाला असे म्हणालो असता त्यावर तलाठी पवार हा चालेल, फक्त तुम्ही हे करा, ओसी उद्या द्या, पत्र काढायला लावतो मी त्यांना असे म्हणाले. त्यावर मी व पंच क्र.1 भालमोडे असे आम्ही तेथुन निघुन अॅन्टी करप्शन ब्युरो जालना कार्यालयात परत आलो. तेव्हा माझे जवळील व्हाईस रेकॉर्डर मशीन पोलीस उपअधीक्षक श्री. जाधवर यांचे सांगणे वरुन पोलीस अंमलदार श्री.घायवट यांनी बंद केली. व्हाईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्ड झालेले संभाषण पोलीस उपअधीक्षक श्री.जाधवर यांनी ऐकले. त्यामध्ये तलाठी पवार यांनी फेर दुरुस्ती बाबत जालना तहसीलदार मॅडम यांचा कलम 155 महाराष्ट्र जमीन महसुल संहिता 1966 नुसार आदेश काढण्यासाठी तहसीलदार मॅडम व पेशकार शिंदे यांचे करीता 20,000/-रुपये लाचेची मागणी करुन लाचेची रक्कम दिनांक 19.12.2024 रोजी स्विकारणार असल्याचे निष्पन्न झाले.

वरील लाच मागणी पडताळणी दरम्यान तहसीलदार मॅडम व पेशकार शिंदे यांच्या नावाने माझ्या कडे तलाठी पवार यांनी लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याने तहसीलदार मॅडम व पेशकार शिंदे हे माझ्या कडे लाच मागतात काय याची खात्री करण्यासाठी त्यांची तहसील कार्यालय जालना येथे भेट घेण्याचे ठरविण्यात आले. त्यावरुन पुन्हा मला,



CamScanner

दोन्ही पंचाना व सापळा पथकास पोलीस उप अधीक्षक श्री.बाळु जाधवर यांनी सुचना देवुन पोलीस अंमलदार श्री. घायवट यांनी व्हाईस रेकॉर्डर मशीन सुरु करुन एका कापडी पिशवीत टाकुन माझ्या शर्टाच्या आतुन गळयात अडकवण्यात आली. त्यानंतर मला पंच क्र.1 भालमोडे यांचे सोबत तहसीलदार मॅडम व पेशकार शिंदे यांना भेटण्यासाठी पाठविण्यात आले. मी व पंच क्र.1 भालमोडे असे आम्ही माझ्या कडील मोपेड स्कुटीने तहसील कार्यालय जालना येथे जावुन अगोदर तहसीलदार मॅडम यांची भेट घेतली. त्यावेळी तहसीलदार मॅडम यांना फेरफार क्रमांक 3791 हा दुरुस्तीच्या कामा बाबत बोललो असता त्यांनी मला सदरचा अर्ज आवक जावक विभागात देऊन टाका, तुम्ही रिसीव्ह घ्या, मी फेर लावते असे सांगितले. त्यावर मी व पंच क्र.1 भालमोडे असे आम्ही पेशकार शिंदे यांच्या बाबत चौकशी करुन त्यांची भेट घेतली. त्यावेळी मी पेशकार शिंदे यांना फेरफार क्रमांक 3791 हा दुरुस्तीच्या कामा बाबत बोललो असता त्यांनी मला सदरच्या अर्जावर पाच रुपयाचे तिकिट लावुन तो आवक जावक विभागात देण्यास सांगितला. त्यावरुन मी तहसील कार्यालय जालना येथील आवक जावक विभागात जावुन अर्ज दिला असता तेथील मॅडम यांनी मला सदर अर्जावर वानखेडे यांची इंडोसमेंट घेण्याचे सांगितल्याने मी दहा नंबरवर जावुन सदर अर्जावर वानखेडे यांची इंडोसमेंट घेऊन तो आवक जावक विभागात जमा करुन ओसी वर त्यांची पोच घेतली. त्यावर मी व पंच क्र.1 भालमोडे असे आम्ही तेथुन निघुन ॲन्टी करप्शन ब्युरो जालना कार्यालयात परत आलो. तेव्हा माझे जवळील व्हाईस रेकॉर्डर मशीन पोलीस उपअधीक्षक श्री.जाधवर यांचे सांगणे वरुन पोलीस अंमलदार श्री.घायवट यांनी बंद केली. व्हाईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्ड झालेले संभाषण पोलीस उपअधीक्षक श्री.जाधवर यांनी ऐकले. त्यामध्ये तलाठी पवार यांनी फेर दुरुस्ती बाबत जालना तहसीलदार मॅडम यांचा कलम 155 महाराष्ट्र जमीन महसुल संहिता 1966 नुसार आदेश काढण्यासाठी तहसीलदार मॅडम व पेशकार शिंदे यांनी लाचेची मागणी केली नसल्याचे निष्पन्न झाले. त्याबाबतचा सापळा पथकाने सविस्तर लाच मागणी पडताळणी पंचनामा केला.

त्यावरुन दिनांक 19.12.2024 रोजी तलाठी पवार यांचे विरुध्द त्यांच्या नेहमी बसण्याच्या ठिकाणी अंबड चौफुली येथील खाजगी कार्यालयात सापळा लावण्याचे ठरविले. त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्री.जाधवर यांचे सूचने वरुन ॲन्टी करप्शन ब्युरो जालना कार्यालयातील त्यांच्या कक्षात पोलीस अंमलदार श्री.जुंबड यांनी अंथ्रासीन पावडरची व अल्ट्राव्हायलेट बॅटरीची माहीती देवुन मला व पंचांना त्याचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. तलाठी पवार यांना लाच म्हणुन देण्यासाठी माझ्या कडील पाचशे रुपये दराच्या 40 नोटा एकुण 20,000/- रुपये रक्कमेला ॲन्थ्रासीन पावडर लावली. सदरील ॲन्थ्रासीन पावडर लावलेले नोटा माझ्या पॅन्टचे उजव्या खिशात ठेवल्या. पोलीस उप अधीक्षक श्री.जाधवर यांनी मला व पंचाना सविस्तर सुचना देवुन तलाठी पवार यांनी लाच स्विकारल्या नंतर (शब्दांची मर्यादा असल्याने गुन्हाची मुळ फिर्याद सोबत जोडली आहे)

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

SURESH RADHAKISHAN UNAWANE(I (Inspector)) / PI **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):



CamScanner

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

**15. Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

PSO ASI
पोलीस ठाणे अंमलदार

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): SURESH RADHAKISH
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PI



CamScanner

क्र.1 भालमोडे असे आम्ही पेशकार शिंदे यांच्या बाबत चौकशी करुन त्यांची भेट घेतली. त्यावेळी मी पेशकार शिंदे यांना फेरफार क्रमांक 3791 हा दुरुस्तीच्या कामा बाबत बोललो असता त्यांनी मला सदरच्या अर्जावर पाच रुपयाचे तिकिट लावुन तो आवक जावक विभागात देण्यास सांगितला. त्यावरुन मी तहसील कार्यालय जालना येथील आवक जावक विभागात जावुन अर्ज दिला असता तेथील मॅडम यांनी मला सदर अर्जावर वानखेडे यांची इंडोसमेंट घेण्याचे सांगितल्याने मी दहा नंबरवर जावुन सदर अर्जावर वानखेडे यांची इंडोसमेंट घेऊन तो आवक जावक विभागात जमा करुन ओसी वर त्यांची पोच घेतली. त्यावर मी व पंच क्र.1 भालमोडे असे आम्ही तेथुन निघुन अॅन्टी करप्शन ब्युरो जालना कार्यालयात परत आलो. तेव्हा माझे जवळील व्हाईस रेकॉर्डर मशीन पोलीस उपअधीक्षक श्री.जाधवर यांचे सांगणे वरुन पोलीस अंमलदार श्री.घायवट यांनी बंद केली. व्हाईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्ड झालेले संभाषण पोलीस उपअधीक्षक श्री.जाधवर यांनी ऐकले. त्यामध्ये तलाठी पवार यांनी फेर दुरुस्ती बाबत जालना तहसीलदार मॅडम यांचा कलम 155 महाराष्ट्र जमीन महसुल संहिता 1966 नुसार आदेश काढण्यासाठी तहसीलदार मॅडम व पेशकार शिंदे यांनी लाचेची मागणी केली नसल्याचे निष्पन्न झाले. त्याबाबतचा सापळा पथकाने सविस्तर लाच मागणी पडताळणी पंचनामा केला.

त्यावरुन दिनांक 19.12.2024 रोजी तलाठी पवार यांचे विरुध्द त्यांच्या नेहमी बसण्याच्या ठिकाणी अंबड चौफुली येथील खाजगी कार्यालयात सापळा लावण्याचे ठरविले. त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्री.जाधवर यांचे सूचने वरुन अॅन्टी करप्शन ब्युरो जालना कार्यालयातील त्यांच्या कक्षात पोलीस अंमलदार श्री.जुंबड यांनी अंथ्रासीन पावडरची व अल्ट्राव्हायलेट बॅटरीची माहीती देवुन मला व पंचांना त्याचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. तलाठी पवार यांना लाच म्हणुन देण्यासाठी माझ्या कडील पाचशे रुपये दराच्या 40 नोटा एकुण 20,000/- रुपये रक्कमेला अॅन्थ्रासीन पावडर लावली. सदरील अॅन्थ्रासीन पावडर लावलेले नोटा माझ्या पॅन्टचे उजव्या खिशात ठेवल्या. पोलीस उप अधीक्षक श्री.जाधवर यांनी मला व पंचाना सविस्तर सुचना देवुन तलाठी पवार यांनी लाच स्विकारल्या नंतर त्यांच्या कार्यालयाच्या बाहेर येऊन डोळयावर लावलेला चष्मा डाव्या हाताने काढुन इशारा करणे बाबत मला सुचना दिली. तसेच सापळा पथकास त्यांचे काम समजावुन सांगुन सुचना देण्यात आल्या. पोलीस अंमलदार श्री.जुंबड यांना सापळा पथकातुन वगळुन कार्यालयातच राहण्याची सुचना दिली. त्याबाबतचा सापळा पथकाने सविस्तर सापळापुर्व पंचनामा केला.

त्यानंतर पोलीस अंमलदार श्री.घायवट यांनी व्हाईस रेकॉर्डर मशीन सुरु करुन एका कापडी पिशवीत टाकुन माझ्या शर्टाच्या आतुन गळयात अडकवुन दिली. मला व पंच क्र.1 भालमोडे यांना तलाठी पवार यांना भेटण्यासाठी त्यांच्या नेहमी बसण्याच्या ठिकाणी अंबड चौफुली येथील खाजगी कार्यालयात पाठविले. मी व पंच क्र.1 भालमोडे असे आम्ही माझ्या मोपेड स्कुटीने त्यांच्या नेहमी बसण्याच्या ठिकाणी अंबड चौफुली येथील खाजगी कार्यालया जवळ गेलो. माझ्या पाठीमागे पोलीस उपअधीक्षक श्री.जाधवर हे त्यांचे सापळा पथक व पंच क्र.2 मदन यांचे सह खाजगी वाहनाने अंबड चौफुली येथील तलाठी पवार यांच्या खाजगी कार्यालया जवळ आले व एकमेकांना दिसतील अशा रितीने परिसरात सापळा लावून थांबले.

मी व पंच क्र.1 भालमोडे असे आम्ही तलाठी पवार यांच्या खाजगी कार्यालयात जावुन त्यांची भेट घेतली. त्याठिकाणी आमचे कामा संबधी बरीच चर्चा झाली. आमच्या चर्चा दरम्यान मी तलाठी पवार यांना अर्जाची ओसी दिली. तेंव्हा आमचे बोलणे चालु असतांना पंच क्र.1 भालमोडे यांचे समक्ष मी माझ्या उजव्या हाताने पॅन्टच्या उजव्या खिश्यातुन अॅन्थ्रासिन पावडर लावलेले 20,000/- रुपये काढुन तलाठी पवार हयांचे समोर धरुन **घ्या बर मोजुन एकदा, वीस हे सर** असे म्हणालो असता तलाठी पवार यांनी त्यांच्या डाव्या हाताने लाचेची रक्कम घेवून त्यांच्या अंगातील पॅन्टच्या समोरील डाव्या बाजुच्या खिश्यात ठेवली. त्यानंतर पुन्हा आमच्यात कामा संबंधी चर्चा झाली. त्यानंतर थोडया वेळाने मी ठरल्या प्रमाणे लाचेची रक्कम स्विकारल्याचा पूर्व नियोजित इशारा केला. ती वेळ अंदाजे पावणे तीन वाजेची होती. त्यानंतर सापळा पथक सक्रीय होवून पंच क्र.2 मदन यांचे सह त्या ठिकाणी आले. पोलीस उपअधीक्षक श्री.जाधवर यांच्या सूचने वरुन पोलीस अंमलदार श्री.घायवट यांनी माझ्या कडील व्हाईस रेकॉर्डर मशीन ताब्यात घेऊन बंद केली. त्यानंतर पोलीस उपअधीक्षक श्री.जाधवर यांनी पंच क्र.1 भालमोडे यांना लाचेची रक्कम कोणी मागितली व कोणी स्विकारली असे विचारले असता पंच क्र.1 भालमोडे यांनी तेथे हजर असलेल्या एका इसमा कडे अंगुली निर्देश करुन हेच तलाठी पवार असुन हयांनी तक्रारदार यांच्या कडुन डाव्या हाताने लाचेची रक्कम घेवून त्यांच्या अंगातील पॅन्टच्या समोरील डाव्या बाजुच्या खिश्यात ठेवली आहे असे सांगितल्याने तलाठी पवार यांना पंचा समक्ष लाचेच्या रक्कमेसह जागेवर पकडले. त्यानंतर पोलीस उपअधीक्षक श्री.जाधवर यांनी त्यांची, पंचाची व सापळा पथकाची ओळख करुन दिली. त्यानंतर तलाठी पवार हयांना त्यांचे नाव गाव पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे नाव शिवदास प्रेमसिंग पवार वय 46 वर्षे व्यवसाय नोकरी ग्राम महसुल अधिकारी सजा इंदेवाडी तहसील कार्यालय जालना मुळ रा.यावल पिंप्री ता.घनसावंगी जि.जालना ह.मु.सोरटी नगर जालना असे सांगीतले. त्यांनी स्वीकारलेली रक्कम कोठे ठेवली असे विचारले असता त्यांनी त्यांच्या अंगातील पॅन्टच्या समोरील डाव्या बाजुच्या खिश्यात ठेवल्याचे सांगितल्याने पंच क्र.2 मदन यांनी त्यांच्या पॅन्टच्या समोरील डाव्या बाजुच्या खिश्यामधुन 20,000/- रुपये काढुन घेवुन सदर नोटांचे क्रमांक व सापळापुर्व पंचनाम्यातील नोटांचे क्रमांक एकच असल्याची खात्री केली. त्यानंतर सदर रुम मधील लाईट खिडक्या बंद करुन काळया कपडयाच्या सहायाने अंधार करुन पोलीस उपअधीक्षक श्री.जाधवर यांनी अल्ट्राव्हायलेट बॅटरीच्या सहायाने तलाठी पवार यांचे दोन्ही हात, अंगातील पॅन्ट व लाचेच्या नोटा चेक केल्या असता तलाठी पवार यांचे डाव्या हाताचे बोटावर, अंगातील पॅन्टच्या समोरील डाव्या बाजुच्या खिश्याच्या तोंडावर व आतमध्ये तसेच लाचेच्या नोटावर ठिक ठिकाणी हिरवट रंगाची चकाकी दिसुन आली. त्यानंतर सदर 20,000/- रुपये लाचेची रक्कम पंचा समक्ष जागीच लाख सिल मोहर करुन जप्त करण्यात आली. तसेच माझे हात व अंगावरील कपडे अल्ट्राव्हायलेट बॅटरीच्या सहायाने चेक केले असता माझे उजव्या हाताचे बोटावर व अंगातील पॅन्टच्या उजव्या बाजुच्या समोरील खिश्याच्या तोंडावर व आतमध्ये ठिक ठिकाणी हिरवट रंगाची चकाकी दिसुन आली. त्यानंतर पोलीस उपअधीक्षक श्री.जाधवर, सापळा पथक, दोन्ही पंच, मी व तलाठी पवार असे अॅन्टी करप्शन ब्युरो जालना कार्यालयात आलो. तसा सविस्तर सापळा पथकाने सापळा पंचनामा केला.

तरी दिनांक 18.12.2024 रोजी आलोसे शिवदास पवार ग्राम महसुल अधिकारी सजा इंदेवाडी यांनी फेर दुरुस्ती बाबत जालना तहसीलदार मॅडम यांचा कलम 155 महाराष्ट्र जमीन महसुल संहिता 1966 नुसार आदेश काढण्यासाठी तहसीलदार मॅडम व पेशकार शिंदे यांचे करीता 20,000/-रुपये लाचेची मागणी करुन आज दिनांक 19.12.2024 रोजी 14.44 वाजेच्या सुमारास अंबड चौफुली येथील त्यांच्या खाजगी कार्यालयात आलोसे शिवदास पवार ग्राम महसुल अधिकारी यांनी स्वत: स्विकारली म्हणुन त्यांचे विरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात यावी ही विनंती.

मी दिलेली फिर्याद माझे सांगणे प्रमाणे संगणकावर मराठीत टंकलीखीत केली असुन त्याची प्रिंट काढुन मी वाचुन पाहिली. ती माझे सांगणे प्रमाणे बरोबर व खरी आहे.

**समक्ष**

(बाळु जाधवर)
पोलीस उपअधीक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो जालना

**ही फिर्याद दिली सही**

CamScanner